# राज्यातील प्रत्येक गाव व्हावं ‘मधमाश्यांचं गाव’



डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: ‘पूर्वा कृषिदूत’)

- ‘मधुक्रांती’च्या वेशीमध्ये ‘मांघार’चं पहिलं पाऊल
- शासनाची ‘मध केंद्र योजना’ सर्वार्थाने ठरावी फलदायी
- जिल्ह्यातील एकाच गावाऐवजी विविध गावांचा विचार व्हावा
- हमखास फुलोरा उपलब्ध होण्यासाठी पीक नियोजन करावे
- गावोगावी तेलाचा लाकडी घाणा; डाळ मिल सुरू करणे हितावह
- मधमाशी पालनातून गावाच्या परिघातच व्यापक रोजगार संधी

देशात सन १९६५ ते १९७१ च्या दरम्यान हरितक्रांती घडून आली. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात प्रचंड वाढ झाली. जनतेला सुरवातीला (निकृष्ट असलं तरी) दोन वेळचं जेवण मिळू लागलं. संकरित वाण, रासायनिक खते, पेस्टिसाईड्स व पाण्याचा ओलितासाठी वापर यामुळे धान्याची कोठारं भरली. पुढे देशी वाणांचा संकर कार्यात उपयोग करून उत्कृष्ट प्रतीचे सरळ किंवा संकरित वाण तयार झाले. रासायनिक निविष्ठा व पाण्याचा अविवेकी तसाच बेसुमार वापर सुरू झाला. विषारी पेस्टिसाईड्सच्या वापरामुळे शत्रू किडींबरोबर मित्रकिडीही नष्ट झाल्या. परागीभवनाचं महत्त्वाचं कार्य करणाऱ्या मधमाश्याही त्यातून वाचू शकल्या नाहीत. त्यापूर्वी जंगलतोड विशेष झालेली नव्हती. नदीनाल्यांच्या काठांवर तसेच शेतांच्या बांधांवरही अनेक झाडेझुडपे होती. या झाडाझुडपांत सातेरी व फुलोरी मधमाश्यांची अनेक पोळी आढळत. उंच झाडे, उंच इमारती व डोंगरातील कडेकपारीत आग्या मधमाश्यांची मोठमोठी पोळी आढळत. झाडांच्या पोकळ खोडांमध्ये कोया माश्यांची (ट्रायगोना) पोळी असत. या सर्व प्रकारच्या मधमाश्या शेतातील पिकांचे व झाडांचे शेतकऱ्यांच्या नकळत परागीभवन करीत.

जंगलातील वृक्षवेलींचेही अनायासे परागीभवन होत असल्यामुळे जैवविविधता टिकून असे. यथावकाश जंगलतोड वाढली. डोंगर टेकड्या उघड्या-बोडक्या झाल्या. नदीनाल्यांच्या काठांवरील व शेतातील बांधांवरील झाडेझुडपे काढण्यात आली. त्यामुळे मधमाश्यांचा अधिवास नष्ट होत गेला. त्याच्या जोडीला मोहोळाला आग लावून मध काढण्याच्या क्रूर पद्धतींमुळे असंख्य मधमाश्या मेल्या व त्यांच्या वसाहती नष्ट झाल्या. या सर्व गोष्टींचा अनिष्ट परिणाम शेवगा, डाळिंब, पेरू, संत्रा, मोसंबी, लिंबू, अंजीर, सूर्यफूल, बियाण्याचा कांदा, मोहरी यासारख्या अनेक परपरागीभवन होणाऱ्या झाडांवर व

पिकांवर दिसून येत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी त्यांच्या पिकांमधील परागीभवनासाठी मधमाश्यांच्या वसाहतींची (पेट्यांची) मागणी करीत आहेत.

## मांघार : मधमाश्यांच्या गावाचा श्रीगणेशा

महाबळेश्वर तालुक्यातील मांघार हे गांव देशातील पहिलं 'मधमाश्यांचं गाव' ठरलं आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मध केंद्र योजना संपूर्ण राज्यात १८ जूनपासून कार्यान्वित झाली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक मधपाळ गटासाठी १८ पेक्षा वय कमी नसावे. उमेदवाराला मंडळ सांगेल त्या ठिकाणी १० दिवसांचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. उमेदवाराला मधपेट्या व इतर साहित्य घेण्यासाठी ५०% शासकीय अनुदान मिळणार आहे. मध व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षणार्थीला मंडळास बंधपत्र लिहून देणे बंधनकारक आहे.

केंद्रचालक प्रगतिशील मधपाळ व्यक्ती गटासाठी अर्जदाराचे वय २१ पेक्षा कमी नसावे. तो किमान १० वी पास असावा. व्यक्तीच्या नावे किंवा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे किमान १ एकर शेतजमीन किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली शेती असावी. लाभार्थ्यांकडे मधमाश्या पालन, प्रजनन व मध उत्पादनाबद्दल लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी. केंद्रचालकासाठी ५० दिवसांचे प्रशिक्षण अनिवार्य आहे. त्याला १० मधपेट्या व इतर साहित्य घेणे आवश्यक आहे.

केंद्रचालक संस्था गटासाठी अर्जदार संस्था नोंदणीकृत असावी. संस्थेच्या नावे अथवा भाडेतत्त्वावर घेतलेली किमान १००० चौ.फू. सुयोग्य इमारत असावी. केंद्रचालकासाठी १० दिवसांचे प्रशिक्षण अनिवार्य असून ५० मधपेट्या व इतर साहित्य घेणे आवश्यक आहे.

आमच्या अनुभवानुसार शेतकरी प्रशिक्षणासाठी १० किंवा ५० दिवस देऊ शकत नाहीत. दहा दिवसांऐवजी ५ दिवसांचे प्रशिक्षण असावे. पाच दिवसात पाहिजे तेवढं ज्ञान व वसाहती हाताळण्याचे कौशल्य शेतकरी मिळवू शकतो. त्याचप्रमाणे ५० दिवसांऐवजी ३० दिवसांचे शिक्षण द्यावे. त्यासाठी प्रशिक्षणार्थींसाठी राहाण्याची व्यवस्था शासनातर्फे असावी.

मंडळाने प्रत्येक जिल्ह्यात एक मधमाशीचे गाव निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मांघार गावाचा विचार केला तर हे गाव जंगलातच वसलेले आहे. त्यामुळे मधमाश्यांना फुलोरा उपलब्ध करण्यासाठी गावकऱ्यांना काहीच नियोजन करण्याची गरज नसते. बाराही महिने येथे फुलोरा उपलब्ध असतो. त्यामुळे गावातील प्रत्येक घराकडे मधमाश्यांच्या वसाहती सहजपणे ठेवता येतात. खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या महाबळेश्वर येथील कार्यालयातर्फे इतर काही जिल्ह्यांमध्ये मधमाश्यांचे गाव तयार करण्यासाठी निवड प्रक्रिया चालू आहे.

जिल्ह्यातून एकाच गावाची निवड करण्यापेक्षा ज्या ज्या गावातील लोकांची मधमाशी वसाहती ठेवण्याची इच्छा आहे, त्या गावांना मधमाश्यांचं गाव बनवण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करण्याची गरज आहे. एवढेच नाही तर प्रत्येक गावात शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

## मधमाश्यांच्या वसाहतींची गरज कशासाठी?

लेखात यापूर्वी उल्लेख केलेल्या कारणांमुळे राज्यात मधमाश्यांच्या वसाहती अतिशय दुर्मिळ झाल्या आहेत. फळातील औषधी गुणधर्म व निर्यातीमधील संधी लक्षात घेऊन राज्यात डाळिंबाची लागवड वाढत आहे. नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेकडील 'कसमादे' पट्टा डाळिंब उत्पादनात आघाडीवर होता. परंतु तेल्या रोगाच्या

प्रकोपामुळे असंख्य शेतकऱ्यांनी बागा काढून टाकल्या. आता निरोगी रोपांची निवड करून नवीन लागवडी होत आहेत. शेवगा हे बांधावरचे झाड. ते बांधावरचे झाड या शतकात शेतामध्ये आले. त्याचाही औषधी उपयोग आहे. निर्यातीच्या संधी उपलब्ध असल्यामुळे शेवग्याची लागवड वाढत आहे. साधारण २५-३० वर्षांपूर्वी नाशिकचा कांदा जगभर प्रसिद्ध होता. हा कांदा निफाड, चांदवड, दिंडोरी, नाशिक व येवला तालुक्यांमध्ये घेतला जायचा. अलीकडे कांदा हे राज्यातील महत्त्वाचं नगदी पीक बनलं आहे. कोकण व पूर्व विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर कांदा घेतला जात आहे. कोकणातील अलिबाग जिल्ह्यात पांढरा कांदा काही प्रमाणात घेतला जातो. लागवडीच्या क्षेत्रात झालेली वाढ लक्षात घेता त्याच्या बियाण्याला प्रचंड मागणी आहे. बियाण्याचे दरही खूप जास्त आहेत. काही शेतकरी स्वत:च्या शेतात ५-१० गुंठ्यांवर कांदा बियाणे तयार करतात, तर काही शेतकरी मोठ्या क्षेत्रावर बियाण्यांची निर्मिती करतात. परागीभवन योग्यप्रकारे होत नसल्यामुळे सूर्यफुलाचे क्षेत्र मात्र कमी झाले आहे.

ही सर्व पिके परपरागीभवन होणारी आहेत. त्यांचे चांगले परागीभवन होऊन भरघोस उत्पादनासाठी मधमाश्यांच्या वसाहतींची गरज आहे. प्रत्येक गावात शेतीच्या भौगोलिक क्षेत्रानुसार १० ते १०० वसाहती ठेवणे आवश्यक आहे. सध्या अशी परिस्थिती आहे की राज्यात असलेले थोडेसेच, अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे मधमाशीपालक रब्बी व उन्हाळी हंगामात राज्यात फुलोरा उपलब्ध होत नसल्यामुळे उत्तर भारतातील विविध राज्यांमध्ये वसाहतींचे स्थलांतर करतात. मोहरी, धने, ओवा, बडीशेप, लिची, नारळ, सफरचंद इत्यादी पिकांच्या शेतात या वसाहती ठेवल्या जातात. आपल्या शेतकऱ्यांनी सुद्धा गावातील शेती क्षेत्रात फुलोरा वर्षभर उपलब्ध राहील या दृष्टीने पिकांचे नियोजन केले पाहिजे. रब्बी हंगामात मोहरी, करडई, जवस अशी पिकं घ्यावीत. त्यापासून मधपाळांना भरपूर मध मिळतो. फुकटात परागीभवन झाल्यामुळे शेतकऱ्यांनाही उत्पादनात भरीव वाढ मिळते. तीनही हंगामात पाण्याची उपलब्धता असल्यास सूर्यफुलाची ठिबक सिंचनावर लागवड करता येते. हेक्टरी मधमाश्यांच्या ५ वसाहती ठेवल्यास भरघोस उत्पादन मिळते. फळझाडांमध्ये डाळिंब, शेवगा, आवळा, पेरू, संत्रा, मोसंबी, लिंबू, जांभूळ, आंबा, पपई इत्यादी पिकांची लागवड करता येईल.

## रोजगार निर्मितीसाठी उपयुक्त

गावातील तरुणांचे व शेतकऱ्यांचे शिवारनिहाय गट स्थापन करावेत. त्यांनी कमीतकमी ५ दिवसांचे प्रशिक्षण घ्यावे. मध केंद्र योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास १० दिवसांचे प्रशिक्षण घ्यावे. त्यामुळे या शेतकऱ्यांना ५०% अनुदानावर मधमाश्यांच्या वसाहती मिळवता येतील. प्रत्येक गटाने एक लाकडी घाणा खरेदी करावा. त्यापासून भुईमूग, सूर्यफूल, मोहरी, तीळ, खुरासणी, करडई, जवस इत्यादी पिकांचे तेल काढावे. या तेलाचे चांगले ब्रॅण्डिंग करावे. त्याला खूप मागणी आहे. या व्यवसायामुळे गावात रोजगार निर्मिती होईल. त्याचप्रमाणे एक डाळ मिल घ्यावी. तूर, मग, उडीद, हरभरा, मटकी या पिकांच्या उत्पादनावर प्रक्रिया करून डाळी तयार करता येतील. या उत्पादनांचेही ब्रॅण्डिंग करता येईल. या उद्योगातूनदेखील रोजगार निर्मिती होईल.

मधमाशीच्या वसाहतींपासून मध, मेण व परागकण यांचे उत्पादन मिळेल. परागकण जमा करण्याचं तंत्र अतिशय सोपं आहे. एका वसाहतीपासून १ वर्षाच्या कालावधीत १५ ते २० किलो मध मिळू शकेल. तरुण शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण देऊन आर्थिक सहाय्य केल्यास तसेच मधमाशी पालनाची आवड निर्माण करण्यासाठी मंडळाने व शासनाने प्रयत्न केल्यास प्रत्येक गाव हे 'मधमाश्यांचं गाव' होईल, असं वाटतं. ■